# बृहन्मुंबई महानगरपालिका
## मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष
## परिपत्रक
## क्र.प्रअभिअ/०६ दिनांक ०२.१२.२००९

**विषय: अभिलेखांची वर्गीकरण पुस्तिका अद्ययावत करण्याबाबत.**

बृहन्मुंबई महानगरपालिकेतर्फे सन १९७७ साली अभिलेख वर्गीकरण पुस्तिका प्रसारित करण्यात आली होती. महाराष्ट्र शासन सार्वजनिक अभिलेख अधिनियम, २००५ नुसार मध्यवर्ती पुराभिलेख कक्षामार्फत त्या पुस्तिकेची सुधारित आवृत्ती तयार करण्यात येऊन ती प्रसारित करण्यात येणार आहे.

सदर पुस्तिकेमध्ये अभिलेख परिरक्षित करण्याबाबत खालीलप्रमाणे वर्गवारी देण्यात आलेली आहे.

| वर्ग | अभिलेख जतन करावयाची कालमर्यादा |
|---|---|
| अ | कायमस्वरुपी |
| ब | ३० वर्षे |
| क-२ | १५ वर्षे |
| क-१ | १० वर्षे |
| क | ०५ वर्षे |
| ड | ०१ वर्षे |

सन १९७७ नंतर नवीन अस्तित्वात आलेल्या खाते/विभागांचा समावेश सदर पुस्तिकेत करण्यात आलेला नाही. अशा खाते/विभागांचा समावेश सदर पुस्तिकेत करणे आवश्यक आहे. तसेच ज्या खाते/विभाागाच्या अभिलेखाची वर्गवारी सदर पुस्तिकेत आहे त्या खात्यांनी अभिलेख जतनाची वर्गवारी खात्यातील कामकाजात झालेल्या बदलाच्या अनुषंगाने ती अद्ययावत करणे आवश्यक आहे.

सन १९७७ सालच्या अभिलेख वर्गवारीची पुस्तिकेची एक प्रत तात्काळ संदर्भाकरीता सोबत जोडण्यात आली असून, ती संदर्भित करुन सर्व खाते/विभाागांनी त्यांच्या खात्यातील अभिलेख जतन वर्गवारीच्या यादी आवश्यक असल्यास बदल करण्यात येऊन त्याला सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेण्यात यावी आणि त्याची एक मराठी व एक इंग्रजी प्रत या कार्यालयात दिनांक २६.०१.२०१० पर्यत पाठवावी. तसेच ज्या खाते/विभागाचे नाव सदर पुस्तिकेत समाविष्ट नाही त्यांनी त्यांच्या खात्यातील अभिलेख जतनाची वर्गवारी तयार करुन त्याला सक्षम प्राधिकाऱ्यांची मंजूरी घेऊन एक मराठी व एक इंग्रजी प्रत या कार्यालयाला दिनांक २६.०१.२०१० पर्यत पाठवावी.

| सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|
| (०१.१२.२००९) | (०१.१२.२००९) | (०२.१२.२००९) |
| (ज्योतिष यो. देसाई) | (गो. प्र. राठोड) | (आशिषकुमार सिंह) |
| प्रमुख अभिलेख अधिकारी | उप आयुक्त (म. भ. प्रा.) | अति. आयुक्त (पू. उ.) |

मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष
६, ७ वा मजला, मिरांडावाडी मनपा
शाळा इमारत, राम मारुती रोड,
शिवाजीपार्क पोलीस स्टेशन शेजारी,
दादर (पश्चिम), मुंबई ४०० ०२८

क्र. प्रअभिअ/०६ दि. ०२.१२.२००९

---

प्रत ........................................................................................................................
(------------ जादा प्रतींसह) यांना माहितीकरिता व पुढील कार्यवाहीकरिता अग्रेषित.

**सही/-**
**प्रमुख अभिलेख अधिकारी**
**मध्यवर्ती पुराभिलेख कक्ष**